Ultimate move to success Join
Choubey's Academy
Admission Open
CBSE & STATE BOARD
11th Sci. & 12th Sci.
Physics & Maths + Electronics
8th 9th 10th
Maths & Science
JEE/MHCET/NEET
Separate Batches
FOUNDATION COURSES
100% Result
Individual Attention
43 Years Experience.
Reasonable Fees
Ardessar Building, Garud Plot, Bhusawal
Prof. R.M. Choubey, Mob. 9422778497

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्वारे उपचार
✓ संडासद्वारे रक्त पडणे व कोंब येणे
✓ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✓ गुदमार्ग लहाण होणे ✓ गुदद्वाराजवळ सेप्टीक होणे
✓ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १९८ । रविवार, दि. १३ जुलै २०२५ । पाने -८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## थोडक्यात

### रेपो रेटच्या कपातीनंतर व्याजदरात घट

**नवी दिल्ली ।** गृह कर्ज घेणाऱ्या नागरिकांना गेल्या कित्येक वर्षांपासून व्याज दरात घट होण्याच्या मागणीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठा दिलासा दिला आहे. आरबीआयने या वर्षी रेपो रेटमध्ये एकूण १०० बेसिस पॉइंटची कपात केली आहे. याचा थेट परिणाम व्याज दरांवर पाहायला मिळतोय त्यामुळं होम लोन घेतलेल्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही कपात पूर्णपणे लागू झाल्यानंतर होम लोन घेणाऱ्या ग्राहकांचा महिन्याचा ईएमआय कमी होऊ शकतो किंवा कर्जाचे वर्ष कमी होऊ शकतात. पण या निर्णयाबरोबरच एक प्रश्नदेखील चर्चिला जात आहे

### दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई ।** हवामान विभागाने पुढील चार आठवड्यांतील महाराष्ट्रामधील हवामानाचा विस्तृत अंदाज जाहीर केला आहे. राज्यात बहुतांश भागात ७ ऑगस्टपर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहण्याची आणि राज्यात सरासरी इतका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण भागात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १७ जुलैपर्यंत विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. उर्वरित भागात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. दुसऱ्या आठवड्यात (१८ ते २४ जुलै) विदर्भाचा काही भाग सोडला तर राज्यातील इतर भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.


### दिल्लीत चार मजली इमारत कोसळली

**नवी दिल्ली ।** दिल्लीच्या ठाणे वेलकम परिसरामधील जनता मजदूर कॉलनीमध्ये शनिवारी एक चार मजली इमारत कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या इमारतीखाली अनेक जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, इमारतीत राहणाऱ्या दहा सदस्यांसहइमारतकोसळण्याच्या वेळी जवळ असलेले काही लोक अडकले होते. दिल्ली अग्निशमन दलाने ही चार मजली इमारत कोसळल्याच्या घटनेनंतर ढिगाऱ्याखाली एक पुरूष आणि एक महिला मृत आढळल्याची पुष्टी केली आहे. तसेच बचावकार्य युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सांगितली आहे.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | 2475 |
| नवती (२) | 2275 |

### मिश्कीली




# जयंत पाटील पायउतार!

## राष्ट्रवादी श.प.पक्षाच्या अध्यक्षपदी शशिकांत शिंदेंची वर्णी?



**मुंबई ।** जयंत पाटील हे अखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरून पायउतार झाले. त्यांनी गेल्या काही महिन्यांपासून या पदावरून निवृत्तीचे संकेत दिले होते. त्यामागील कारण त्यांनी कधी समोर आणले नाही. पण नवीन उमद्या नेतृत्वाला संधी देणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी यापूर्वी मांडले होते. शरद पवार यांनी भाजपासोबत जाण्यास नकार दिला होता. त्यानंतर आता जयंत पाटील हे पायउतार झाल्याने ते कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. दुसरीकडे पक्षाच्या नविन प्रदेशाध्यक्षपदी

राष्ट्रवादी फुटल्यानंतर जयंत पाटील हे शरद पवार यांच्यासोबत राहिले. त्यांच्याकडे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा होती. आपल्याला आता या जबाबदारीतून मुक्त करावे असे त्यांनी यापूर्वी पक्षाच्या कार्यक्रमात अनेकदा भावना व्यक्त केली होती. तर १० जून रोजी पक्षाचा वर्धापन दिन कार्यक्रम झाला. त्यावेळी मला पक्षाने आणि शरद पवार यांनी बरीच संधी दिली. सात वर्षांचा कालवधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. सर्वांदेखत त्यांना विनंती करेन की शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. त्यांनी योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला बरेच पुढे जायचे आहे, अशा भावना त्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केल्या होत्या. आता पुढे जयंत पाटील हे कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिंदे यांच्या गळ्यात माळ



शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांचे नाव पुढे आले. त्यांच्या गळ्यात प्रदेशाध्यक्षपदाची माळ पडली. १५ जुलै रोजी शशिकांत शिंदे पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील. नवीन चेहऱ्यांना संधी देण्याची मागणी गेल्यावेळी जयंत पाटील यांनी केली होती. शशिकांत शिंदे यांनी यावेळी सांगितले की काही नावांसोबत माझ्या नावाची चर्चा आहे. तुमच्या माध्यमातून माझ्या निवडीचे वृत्त कळाले आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वातील या मोठ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पद ज्याला मिळेल हे त्याचे भाग्य असेल असे मला वाटते, असे शिंदे म्हणाले. तर जयंत पाटील यांच्या नेतृत्वात पक्षाने सर्व आव्हानांना तोंड दिले. लोकसभा, विधानसभा निवडणुका त्यांच्या कार्यकुशलतेत लढवल्या गेल्या. त्यांनी कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम केले. १५ जुलै रोजी बैठक होणार आहे. त्यामुळे त्यांनी तडकाफडकी नाही तर विचारपूर्वक राजीनामा दिला असे मला वाटते, असे शिंदे म्हणाले.




# पुणे जाणारे विमान गोव्याला

### पुणे प्रवास रद्द

**जळगाव ।** जळगावहून पुण्याला जाणारे विमान रद्द करुन ते गोव्याला पाठविण्यात आले.यामुळे प्रवाश्यांना मनस्ताप सहन करावा लागला. जळगाव विमानतळावर या घटना वारंवार होत असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.या विमानाने पुण्याला जाण्यासाठी अनेक महत्वाचे अधिकारी व व्यापारीवर्ग विमानतळावर थांबलेले असताना एनवेळी त्यांना पुण्याला जाणारे विमान रद्द झाल्याची माहिती देण्यात आली.

**प्रवासी ताटकळले**

विमानातील तांत्रिक कारणामुळे पुण्याला निघालेले विमान ऐनवेळी रद्द करून ते गोव्याला नेण्यात आले. या समस्येमुळे पुणे जाणारे प्रवाशी शनिवारी चांगलेच ताटकळले होते. याबाबत व्यवस्थापकांशी संपर्क साधला असता त्यांनी पुणे फ्लाईट रद्द करण्यात आल्याचे सांगितले.

विमान सेवेमध्ये सध्या मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. जळगाव विमानतळावरून फ्लाय ९१ द्वारे जळगाव पुणे अशी प्रवासी हवाई सेवा आहे. शनिवारी सायंकाळी पुणे जाण्यासाठी प्रवाशी विमानतळावर हजर झाले होते. मात्र विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने शनिवारची पुणे सेवा रद्द करण्यात येऊन ते गोव्याला उतरविण्यात आले. दरम्यान तांत्रिक बिघाडाची दुरूस्ती करण्यात आली असल्याची माहिती विमानतळाचे व्यवस्थापक त्रिपाठी यांनी दिली.

# न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज-न्या. गवई



**नवी दिल्ली ।** भारतीय न्यायव्यवस्थेसमोर मोठी आव्हाने असून न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले आहे. सरन्यायाधीश गवई हे शनिवारी हैदराबाद येथील नालसर लॉ युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी गवई यांनी न्यायव्यवस्थेच्या स्थितीबद्दलही चिंता व्यक्त केली आहे. सरन्यायाधीश भूषण गवई काय म्हणाले? भारताची कायदेशीर व्यवस्था मोठ्या आव्हानांना तोंड देत आहे. त्यामुळे तिचे निराकरण करण्याचे अत्यंत गरजेचे आहे. यामध्ये दशकांपर्यंत चालणाऱ्या खटल्यांचा देखील समावेश आहे. आता मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की आपल्या न्यायव्यवस्थेत सुधारणांची नितांत आवश्यकता आहे. पण तरीही मी भविष्याबद्दल आशावादी आहे की माझे सहकारी नागरिक आव्हानांना तोंड देतील आणि सुधारणा घडवून आणतील, असे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी म्हटले आहे.

काही खटल्यांमध्ये विलंब होऊन ते कधीकधी दशकांपर्यंत चालतात. आपण अशा प्रकारचे काही प्रकरण पाहिलेले आहे की जिथे एखाद्या व्यक्तीने वर्षानुवर्षे तुरुंगात कैदी म्हणून घालवल्यानंतर त्याला निर्दोष ठरवण्यात आलेले आहे, असे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले आहेत. तसेच भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी येणाऱ्या पिढीवर त्यांनी विश्वासही व्यक्त केला आहे.

दरम्यान, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबावर आर्थिक भार टाकण्याऐवजी शिष्यवृत्तीवर विदेशात पुढील शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले. आई-वडिलांवर अवलंबून न राहता स्कॉलरशिपच्या माध्यमातून शिक्षण घेण्याचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्रामाणिकपणाच्या आधारावर मार्गदर्शक निवडण्याचं आवाहन केले.

# ‘जगन्नाथ’च्या भाविकांवर काळाचा घाला, ४ जण ठार!



**कोलकाता ।** पश्चिम बंगालमध्ये शनिवारी सकाळी भीषण अपघात घडला. मेदिनीपूर जिल्ह्यातील बेलदा येथील राणीसराय परिसरात कार आणि ट्रक यांच्यात समोरासमोर धडक झाली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. या अपघातात कारचा अक्षरश: चक्काचूर झाला.

शनिवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास स्कॉर्पिओ कारमध्ये बसून जगन्नाथाच्या दर्शनासाठी आसनसोलहून दिघा येथे जात होती. परंतु, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६ वर स्कॉर्पिओ आणि ट्रक यांच्यात समोरासमोर धडक झाली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, स्कॉर्पिओ कारचालकाने नियंत्रण गमावले आणि त्यांची कार दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने गेली आणि समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, स्कॉर्पिओचा अक्षरश: चक्काचूर झाला. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. कारमधून मृतदेह बाहेर काढण्यासाठी गॅस कटरची मदत घ्यावी लागली.

या घटनेची माहिती मिळताच बेलदा पोलिस ठाणे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. सर्व मृतदेह बेलदा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सर्व मृत पश्चिम बंगालमधील आसनसोल येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच त्यांच्या कुटुंबियांमध्ये आणि स्थानिक लोकांमध्ये शोककळा पसरली आहे. सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.



**पुणे ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग मिसिंग लिंक प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री चढले पुलावर

**पुणे ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी विविध विकास कामांची पाहणी केली. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय महामार्गाच्या सुरु असलेल्या कामावर आढावा घेण्यात आला. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली.

पुण्यातील कार्यक्रम आटोपून मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांचा ताफा सरळ घाटात सुरु असलेल्या बोगद्याकदे वळला याठिकाणी महाकाय पुलाचे बांधकाम सुरु असून, या पुलाच्या निर्मितीनंतर कोल्हापूर जाणाऱ्या वाहतुकीचा वेळ कमी होणार आहे. प्रगतीपथावर असलेल्या या पुलाची पाहणी करतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरळ पुलावर चढत कामाची पाहणी केली. यावेळी अधिकारीवर्गाची एकच तारांबळ उडाली. फडणवीसांनी कामातील बारकावे समजावून घेत, अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी पुण्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## हाती बांधले घड्याळ : कमळ, धनुष्यबाण नाराज

# सत्तेचे समीकरण गुलाबराव देवकरांसाठी मृगजळ!

रवींद्र पाटील । जळगाव


जिल्ह्याचे माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर यांनी दोन महिन्यांपूर्वी शरद पवारांची साथ सोडत अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. अर्थात तुतारी सोडून त्यांनी हातात पुन्हा घड्याळ बांधले. विकासासाठी आपण अजित पवारांसोबत जात असल्याचे यावेळी देवकर म्हटले असले तरी सत्तेच्या प्रवाहात गेल्यानंतर मागे असलेल्या अनेक कटकटी दूर होतील, हा त्यामागचा खरा हेतू होता. पण धुळे येथील उपनिबंधकांनी दिलेल्या अहवालात जिल्हा बँकेचे चेअरमन असताना देवकरांनी श्रीकृष्ण शैक्षणिक संस्थेला दिलेले १० कोटी रुपये कर्ज बेकायदेशीर ठरवत एकरकमी भरण्याचे दिलेले आदेश पाहता सत्तेचे समीकरण देवकरांनी जुळवले असले तरी ते भाजपा व शिवसेना अर्थात कमळ व धनुष्यबाणाला रुचलेले नाही, हे स्पष्ट होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गुलाबराव देवकर यांच्यावर विविध आरोप-प्रत्यारोप त्यांच्या विरोधकांनी केले आहे. घरकुल घोटाळ्यापासून



सुरु झालेली ही मालिका जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना आपल्याच संस्थेला दिलेल्या कर्जापर्यंत पोहोचली आहे. त्यातच विरोधी पक्षात असल्याने सतत कारवाईची टांगती तलवार डोक्यावर ठेवण्यापेक्षा देवकरांनी काही दिवसांपूर्वीच शरद पवारांची साथ सोडत सत्तेत असलेल्या अजित पवारांना जवळ केले. देवकरांना पक्षात घ्यायला जिल्हाध्यक्ष व विद्यामान जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांचा विरोध असतानाही त्यांना पक्षात घेतले गेले. त्यावेळी प्रत्येक पक्षाला ताकद वाढवावी लागते, असे प्रदेशाध्यक्ष तटकरेंनी सांगितले होते. त्यानंतर त्यांचा यथोचित प्रवेश झाला.

### दादांच्याच मंत्र्यांकडे असलेल्या खात्याची चपराक



विशेष म्हणजे देवकरांवर जो ठपका ठेवण्यात आलेला आहे ते सहकार मंत्रालय अजित पवारांच्याच कोट्यातील असून बाळासाहेब पाटील हे त्या खात्याचे मंत्री आहे.ज्यांनी गेल्याच महिण्यात जळगाव जिल्ह्याचा दौरा केला होता अन् त्यांच्या स्वागताच्या जाहिराती देवकरांनीच झळकावल्या होत्या.

### शिवसेनेच्या गुलाबराव पाटलांशी पंगा कायम



जळगाव ग्रामीण हा दोघे गुलाबरावांचा मतदारसंघ. २००९ मध्ये नवीनच तयार झालेल्या या मतदारसंघात पहिल्यांदाच राष्ट्रवादीच्या तिकिटावर मैदानात उतरलेल्या देवकरांनी पाटलांना पराभवाचा दणका दिला. त्यातच देवकरांचे दैव त्यावेळी बलवत्तर असल्याने त्यांना मंत्रिमंडळातदेखील संधी मिळाली. पण २०१४ मध्ये देवकरांना या संधीचे सोने करता आले नाही. राजकारणात मुरलेल्या पाटलांनी या निवडणुकीत बदला घेत त्यांना पराभूत केले. २०२४ मध्ये पुन्हा एकदा जळगाव ग्रामीणमधून त्यांनी गुलाबराव पाटलांच्या विरोधात दंड थोपटले. यावेळीदेखील ते चीतपट झाले. त्यामुळे देवकरांना सत्तेत सहभागी करून घेण्यास गुलाबराव पाटलांचा स्पष्ट विरोध होता. तरीदेखील अजितदादांनी त्यांना पक्षात स्थान दिले. पण देवकरांशी असलेला पंगा गुलाबराव पाटील आजही विसरलेले नाहीत.

### गिरीश महाजनांची दादांवर नाराजी



गुलाबराव देवकरांच्या प्रवेशानंतर राज्याचे मंत्री व जळगावचे भाजपाचे सर्वेसर्वा गिरीश महाजन यांनीदेखील अजितदादांवर नाराजी व्यक्त केली होती. खरे म्हणजे महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढलेल्या व पराभूत झालेल्या लोकांना मित्रपक्षांनी आपल्या पक्षात घेऊ नये, असे ठरलेले असताना दादांनी देवकर व अन्य लोकांना प्रवेश कसा दिला; हे न समजणारे आहे, अशी प्रतिक्रिया महाजनांनी त्यावेळी दिली होती. त्यामुळे महाजनदेखील देवकरांच्या प्रवेशावर नाराज असल्याचे यातून स्पष्ट होते.